# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- पाणी टँकर भाडे या लेखा शिर्षात तरतूदीचे पुर्नविनियोजन करणे कामी प्रशासकीय आर्थीक मान्यता मिळणे बाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क), ९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयूक्त सो यांचे अधिकार आहेत त्याच प्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक तयार केले जातात. त्याप्रमाणे सन २०२३-२०२४ या आर्थीक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थीक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदीमधून आतापर्यंत खर्च करण्यांत आलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे नमूद आहे. **(आकडे लाखात)**

| अ.क्र | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | सन २०२३-२४ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | शिल्लक तरतूद | पुर्नविनियोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी टँकर भाडे | २०.०० | १९.९३ | ०.०७ | ३० लक्ष |
| | एकुण | २०.०० | १९.९३ | ०.०७ | ३० लक्ष |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये पाणी टॅकर भाडे या लेखाशिर्षामध्ये पाणी पुरवठा विशेष बाब या सोईच्या दृष्टीने शहरात पाणी टंचाई परिस्थिती निर्माण होऊ नये या करिता पाणी टंचाई भागात खाजगी टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी निधी अभावी प्रस्ताव प्रलंबित आहेत. सदर लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजनाच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या कलम (१ ब) नुसार मा. प्रशासक तथा आयुक्त सो, यांची दि.०२/०६/२०२३ रोजी मान्यता मिळालेली आहे.

**शासन आदेश क्र.एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.**

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात २५ एम.एल.डी. पाणी पुरवठा अंतर्गत योजना कार्यान्वीत करणे या लेखाशिर्षात रु.२२४.७२ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. या तरतुदीमधुन आतापर्यंत खर्च झालेला नाही. सदरची तरतुद अखर्चितआहे. त्यापैकी पाणी टॅकरभाडे या लेखाशिर्षात रु.३० लक्ष पुर्नविनियोजन करणे करिता पाणी पुरवठा विभागाकडून प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव क्रमाक** ९९७ **दिनांक**१५/६/**२०२३**

पाणी टँकर भाडे या लेखा शिर्षात तरतूदीचे पुर्नविनियोजन करणे कामी प्रशासकीय आर्थीक मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब)

मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभागाकडील पाणी टँकर भाडे या लेखा शिर्षात तरतूदीचे पुर्नविनियोजन करणे कामी मान्यता देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

**प्रस्तावना :- कचरा ढिग लेव्हल करणेसाठी पोकलन मशीन भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी प्राप्त झालेले L1 मधील निविदाकार यांची निविदा रद्द करुन L2 मधील निविदेस मान्यता मिळणे बाबत.**

चाविंद्रा-रामनगर येथील डंपीग ग्राऊंड येथे कचरा ढिग लेव्हल करणेसाठी पोकलन मशीन भाडेतत्वावर पुरविणे करिता ऑनलाईन ई-निविदे द्वारे फेर निविदे मध्ये २ निविदाकार प्राप्त झाल्याने शासन परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२/दि.२९/०१/२०१९ नुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई-निविदा संदर्भातील दि.२७/०९/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदी बाबत स्पष्टीकरण या शिर्षकानुसार अ.क्र.१ मध्ये दि.२७/०९/२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४.३ परिच्छेद ४.४ तरतुदी बाबत विसंगती दुर करण्यात येत असुन परिच्छेद ४.३० मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा पात्र झाल्यास नियामानुसार लिफाफा क्र.२ (आर्थिक देकार) उघडुन पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी प्रथम बोली वेळी प्राप्त निविदा मध्ये तीन पात्र निविदा असण्याची आवश्यकता लिफाफा क्र.२ खुले करण्यात आले असता खालील प्रमाणे खर्च प्राप्त झाले आहे.

| कामाचा तपशील | मे.एस.एस.इलेक्ट्रीक भिवंडी | मे.बरकत कॉन्ट्रॅक्टर |
|---|---|---|
| चाविंद्रा-रामनगर डंपीग ग्राऊड येथे कचरा ढिग लेव्हल करणेसाठी पोकलन मशीन भाडेतत्वावर पुरवठा करणेकरिता प्रति दिन आठ तासा करिता.रु.१७,०१६/- त्यानुसार १८० दिवसासाठी रु.३०,६२,८८०/- | रु.२,८०,०००/- | रु.२७,२७,२७९/- |

वरिल तक्त्यानुसार याकामी सर्वात कमी खर्च एस.एस.इलेक्ट्रीक भिवंडी,यांनी १८० दिवसासाठी रु.२,८०,०००/- असे सादर केले होते.परंतु सदर संस्थेने १८० दिवसाकरिता सादर केलेला खर्च हा नजर चुकीने नमुद केल्याचे पत्र विभागात सादर केले होते.

मे.एस.एस.इलेक्ट्रीक यांनी सादर केलेले पत्रानुसार डंपीग ग्राऊंड येथील कचरा ढिग लेव्हल करणेच्या कामात अडथळा निर्माण झाल्याने तेथील स्थानिक नागरिकांचा आरोग्यचा प्रश्न निर्माण होणार होवुन कामाची निकड लक्षात घेता व शासन परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/ इमा-२/दि.२९/०१/२०१९ नुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई-निविदा संदर्भातील दि.२७/०९/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदी बाबत स्पष्टीकरण या शिर्षकानुसार अ.क्र.१ मध्ये दि.२७/०९/२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.७,नुसार कार्यवाही होणेसाठी मे.एस.एस.इलेक्ट्रीक भिवंडी यांची अनामत रक्कम जप्त करुन १ वर्षाच्या कालावधीसाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या सर्व विभागा मधील निविदा दाखल करणेस प्रतिबंध करण्यास व निविदे मधील प्राप्त झालेले L2 मे.बरकत कॉन्ट्रॅक्टर, यांनी १८० दिवसाच्या कालावधी पोकलन मशीन भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी सादर केलेल्या खर्च रु.२७,२७,२७९/- प्रस्तावित केले असता मा.आयुक्त सो. यांनी पोकलन मशीन २ महिन्याच्या कालावधीसाठी (६० दिवसाच्या कालावधीसाठी रु.९,०९,१२०/-) होणा-या खर्चास मान्यता दिली असुन सद्यास्थितीत मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३

(क) नुसार संविदा होणेकरिता मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळवी ही विनंती.

**प्रशासकिय ठराव क्र.** १८६ **दि.** ८/६ /२०२३

मे.एस.एस.इलेक्ट्रीक भिवंडी यांची अनामत रक्कम जप्त व १ वर्षाच्या कालावधीसाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या सर्व विभागा मधील निविदा दाखल करणेस प्रतिबंध करण्यास व निविदे मधील प्राप्त झालेले L2 मे.बरकत कॉन्ट्रॅक्टर, यांनी १८० दिवसाच्या कालावधी पोकलन मशीन भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी सादर केलेल्या खर्च रु.२७,२७,२७९/- इतक्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे कामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,डंपीग ग्राऊंड येथे कचरा ढिग लेव्हल करणेसाठी पोकलन मशीन भाडेतत्वावर पुरवठा करणे ऑनलाईन निविदे मध्ये प्राप्त झालेले L2 मे.बरकत कॉन्ट्रॅक्टर, यांनी १ महिन्याचा कालावधी करिता रु.४,५४,५६०/- मात्र इतक्या खर्चास व मे.एस.एस.इलेक्ट्रीक,भिवंडी यांची अनामत रक्कम जप्त करुन १ वर्षाच्या कालावधीसाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या सर्व विभागा मधील निविदा दाखल करणेस प्रतिबंध करण्यास मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**

**प्रशासक तथा आयुक्त,**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**प्रस्तावना :- स्वच्छ भारत मिशन अर्बन २.० घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी (Legacy Wast) बायोमॅनि़गच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदाकारास मान्यता मिळणे बाबत.**

स्वच्छ भारत मिशन- अर्बन २.० घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी (Legacy Wast) बायोमॅनि़ग कामाकरिता होणा-या खर्चास प्राप्त झालेल्या मान्यते नुसार निविदा सुचना क्र.८ (फेर-२), दि.२४/०४/२०२३ ते दि.०८/०५/२०२३ या कालावधीत निविदा प्रसिद्ध करण्यात आली असता सदर निविदेस प्रतिसाद प्राप्त न झाल्याने स्पर्धात्मक निविदाकार प्राप्त होणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन परिपत्रक क्र.सीएटी-२०१९/ प्र.क्र.८/इमा-२, दि.२७/०९/२०१८ चा मुद्दा क्र.२ येथील २.१ मधील द्वितीय वेळ १५ दिवसाचा कालावधी असल्याने निविदा प्रसिद्ध करुन दि.०८/०५/२०२३ ते ते दि.११/०५/२०२३ रोजी दुपारी १५.०० पर्यत (चार दिवसाच्या कालावधी करिता) प्रसिद्ध कालावधी ठेवुन दि.१२/०५/२०२३ रोजी संगणक विभागाकडील अहवाला नुसार याकामी २ निविदाकार प्राप्त झाल्याने प्राप्त निविदाकार यांचे लिफाफा क्र.१ खुले करुन आवश्यक दस्तऐवजाची पुर्तता मा.निविदा समिती समक्ष सादर करण्यात आले असता खालील निविदाकार पात्र होवुन त्यांचे लिफाफा क्र.२ खुले करण्यात आले असुन (आर्थिक बोलीचा) त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | निविदाकारांचा तपशील | प्रति टनासाठी प्राप्त दर | एकुण खर्च रु. |
|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ भारत मिशन- अर्बन २.० घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी ४६२१७८.१४ मेट्रीक टन कच-यावर बायोमॅनि़ग प्रक्रिया करणे (Legacy Wast) बाबत | Ms.Hind Agro And Chemicals ,Kolhapur | रु.४१३/- | रु.१९,०८,७९,५७१.८२ |
| | | Suprime Gold Irrigation Ltd ,Nanded | रु.४११/- | रु.१८,९९,५५,२१५.५४ |

वरिल पात्र निविदाकार यांचे लिफाफा क्र.२ खुले करण्यात आले असता मे.Suprime Gold Irrigation Ltd ,Nanded यांनी प्रति टनासाठी रु.४११/- असे सादर केले आहेत.

स्वच्छ भारत मिशन- अर्बन २.० घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी बायोमॅनिग प्रक्रिया करणेकरिता प्रति टनासाठी रु.४४७/- इतका असुन ४६२१७८.१४ इतक्या टनासाठी रु.२०,६५,९३,६२८/- मात्र खर्चास प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली आहे.निविदे द्वारे प्राप्त झाले प्रति टन रु.४११/- या प्रमाणे रु.१८,९९,५५,२१५.५४ असा खर्च येत आहे प्राप्त खर्चा प्रमाणे रु.१,६६,३८,४१२/- इतका खर्च कमी ने भरला आहे.सद्यास्थितीत मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेकरिता मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळवी ही विनंती.

**प्रशासकिय ठराव क्र.** ~~१८६~~ १९५ **दि.**०८/०६ **/२०२३**

स्वच्छ भारत मिशन- अर्बन २.० घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी बायोमॅनिग प्रक्रियाकरणेसाठी मे. Suprime Gold Irrigation Ltd ,Nanded,यांनी रु.१८,९९,५५,२१५.५४ असे दर सादर केले असून सादर केलेल्या प्राप्त खर्चास व निविदाकाराक मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे कामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, स्वच्छ भारत मिशन- अर्बन २.० घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी बायोमॅनिग प्रक्रिया करणेकरिता मे. Suprime Gold Irrigation Ltd ,Nanded,यांनी प्रति टनासाठी रु.४११/- इतका असुन ४६२१७८.१४ इतक्या टनासाठी रु.१८,९९,५५,२१५.५४ इतका खर्च सादर केला असल्याने सादर केलेला खर्च हा मनपाच्या अंदाजित खर्चा पेक्षा ८.०५ % ने कमी सादर केली असुन मनपाच्या अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी दराच्या(रु.१,६६,३८,४१२/-) निविदेस व महाराष्ट्र शासनाने निर्देश दिल्याप्रमाणे तांत्रिक मान्यतेची पुर्तता करणेच्या अधिन राहुन मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका